## एस.एम.जोशी महाविध्यालयात आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस साजरा

डिजिटल साक्षरतेतून सुद्दढ समाजाची निर्मिती होते. - डॉ. हर्षा गोयल

दि. ८ सप्टेंबर २०२१ रोजी एस.एम.जोशी महाविध्यालयात आंतरराष्ट्रीय दिवस साजरा करण्यात आला. कॉलेजमध्ये अर्थशास्त्र व राज्यशास्त्र विभाग अंतर्गत वेबिनार आयोजित करण्यात आले होते. जगाला डिजिटल साक्षरतेची गरज आहे. शिक्षकांच्या माध्यमातून आपण डिजिटल साक्षरतेमध्ये खूप काम करू शकतो, जग बदलू शकतो, युवकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करू शकतो, तंत्रज्ञानाप्रमाणे आपणही आपल्यात बदल केला पाहिजे. साक्षरतेच्या माध्यमातून सायबर फसवणुकीची भीती आपण लोकांमधून कमी करू शकतो. यातूनच सुद्दढ जागतिक समाज निर्माण करू शकतो असे याप्रसंगी कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज वाशी महाविध्यालायातील कॉमर्स फॅकल्टीच्या डीन डॉ. हर्षा गोयल प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होत्या. अध्यक्षस्थानी एस .एम. जोशी कॉलेजचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे उपस्थित होते. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना ते म्हणाले की, कोरोनामुळे ऑनलाइन शिक्षण सुरू झाले आहे, त्यामुळे विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्यात डिजिटल साक्षरता निर्माण करण्याची गरज आहे. भारतात फार थोडे लोक डिजिटल साक्षर आहेत. भारतात आज सुद्धा साक्षरतेचा दर केवळ 77 टक्के आहे. त्यामुळे हा दर वाढवण्याची आवश्यकता आहे असे त्यांनी अध्यक्षीय मनोगतात व्यक्त केले. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय डॉ. एकनाथ मुंढे यांनी केला. सुत्रसंचालन व आभार डॉ. सरोज पांढरबळे यांनी मानले. कार्यक्रम प्रसंगी उपप्राचार्य डॉ.संजय जगताप, उपप्राचार्य डॉ.संजय जडे, आय. क्यू. ए. सी. चेअरमन डॉ. किशोर काकडे, डॉ. विश्वास देशमुख व डॉ.कांबळे एफ. जे., प्राध्यापक, प्रशासकीय सेवक व विध्यार्थी उपस्थित होते.

